International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 5.681
Vol.5 No.6 July-August2018

# बंजारा समाजाच्या व्यावसायिक जीवनाचा ऐतिहासिक मागोवा

**दिपक कोलू वळवी**

अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई(प.),पालघर

**प्रस्तावना :**

बंजारा या जमातीचे अस्तित्व भारतात प्राचीन काळापासून आहे बैलाच्या पाठीवरुन मालाने भरलेल्या गोण्य लादून ते सर्व भारतभर पोहचवणारी व व्यापार करणारी अशी एकमेव प्राचीन जमात म्हणजे बंजारा जमात होय .भारतात विविध भागात या जमातीस बंजारी ,ब्रिजारी ,लंबाडी ,लमाणी ,सुकाली किंवा सुगाली इत्यादी नावांनी ओळखले जाते .बंजारा ही मूळची राजस्थानातील जमात असावी व तेथून ती सर्व भारतभर पसरली असावी यासंबंधीचे अनेक पुरावे सापडतात .ही जमात आर्यपूर्व काळात भारतामध्ये प्रगत असे नागरी जीवन जगत होती .सिंधू संस्कृती ,ऋग्वेद व हिंदू संस्कृती या प्रसिद्ध ग्रंथाचे लेखक प्र.रा.देशमुख यांनी आपल्या या बहुमोल ग्रंथातून बंजारा जमात ही आर्यपूर्व सिंधू संस्कृती मध्ये असणारी 'अही' ही जमात होती हे अनेक संदर्भ साधनांच्या आधारे सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

बंजारा समाजाच्या सामान्यपरिस्थितीविषयी पी .बी.रामपुरे यांच्या मतानुसार "भारतातील बंजारा समाजाचा इतिहासप्राचीन तसेच गौरवशाली आहे .राजस्थानातील साहसी व पराक्रमी वीरांचे ते वंशज आहेत .ते राजस्थानातून आले आणि संपूर्ण भारतात पसरले .प्राचीन काळापासून बंजारा हा भटका समाज आहे. ज्यांचा प्रमुख व्यवसाय व्यापार आहे .एका ठिकाणाहून बैलाच्या पाठीवर सामान लादुन तो दुसऱ्या ठिकाणी पोहचविणे आणि त्या ठिकाणी आवश्यक वस्तूंची खरेदी-विक्री करून आपल्या परीवारासोबत फिरत राहणे. ही बंजारा समाजाची विशेषता आहे .मध्ययुगीन काळात मोगलांच्या फौजासाठी रसदपुरवठा करण्याची जबाबदारी बंजारा समाजाच्या खांद्यावर होती .मोगलांचा अस्त

झाल्यावर इंग्रजांच्या काळात रेल्वे आणि इतर दळणवळणाची साधने आली. त्यामुळे त्यांचा मिठाचा व्यवसाय नष्ट झाला .काळाच्या ओघात या समाजातील लोक जिकडे-तिकडे विखुरले गेले .वेगवेगळया प्रदेशात या समाजाची ओळखही एकसारखी राहिली नाही .ज्या काळात भारतात दळणवळणाची कोणतीही सोय नव्हती अशा काळात बंजारा समाजाच्या तांड्यांवर दळणवळणाची भिस्त अवलंबून होती.

**उद्देश :**

१) बंजारा समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.

२) बंजारा समाजाच्या आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे.

३) बंजारा समाजाचा मूळ व्यवसाय समजून घेणे.

**गृहीतके :**

१) बंजारा समाजाचे अस्तित्व प्रचीन काळापासून आहे

२) बंजारा समाजाचा व्यवसाय भारतातील अनेक भागातूनचालत होता.

३) बंजारा समाजाने सुरुवातीला प्रामुख्याने मिठाचा व्यवसाय केला.

४) भटक्या स्वरूपाच्या जीवनामुळे बंजारा समाजाला अनेक समस्यांचा सामना करावा लागला.

**संशोधन पद्धती :**

इतिहास विषय हे सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत येत असल्यामुळे विविध सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतींचा उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त ठरतात.प्रस्तुत संशोधन विषय बंजारा समाजाचा व्यावसायिक जीवनाचे ऐतिहासिक विवेचन हे असल्यामुळे या विषयावर संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक व ग्रंथसूची संशोधन या समाजशास्त्रीय संशोधन पद्धतींचा अवलंब केलाआहे . तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय विवेचन :**

बंजारा समाजाचा पारंपारिक मुख्य व्यवसाय लदेणी म्हणजे लादणे किंवा भार लादून नेणे होय बैलांच्या पाठीवरून विविध प्रकारची साधन सामग्री एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वितरण करण्याचे काम बंजारे करत असत. गाई बैलांच्या पाठीवर लादलेल्या मालासहित त्यांना चारत चारत डोंगरदऱ्यातून लदेणी केलीजाई.लदेणीकरण्यासाठी उपयोगात येणाऱ्या विविध मार्गांचा उल्लेख 'लमान मार्गात' आढळतो. ज्या मार्गाने या समाजाने लदेणीचा व्यवसाय केला तो लदेणीमार्ग म्हणून ओळखला जातो. इतिहासकार एस. आर. कानिटकर यांनी असे म्हटले आहे की,"लमाना द्वारे मोठ्या प्रमाणात मालवाहतुकीचे काम करण्यात आले आहे इसवी सन पूर्व ६००ते ३०० या काळातील लोकांच्या स्थितीचे वर्णन करताना दुष्काळाच्या काळात त्यांच्या लदेणीसाठी बैल आणि उंटाचा वापर मालवाहतुकीसाठी करण्यात आला होता." बंजारा समाजाचे लदेणीकालीन जीवन खूप प्राचीन आहे. या काळात दळणवळणाची कोणतीही प्रमुख सुविधा नसल्याने ही व्यवस्था बंजारा समाजाच्या फिरत्या तांड्यावर अवलंबून होती सर्व धर्माच्या प्रसारकांनी धर्मप्रचारासाठी फिरताना या लदेणीच्या बंजारांच्या तांड्याची मदत मागितल्याचे उल्लेख सापडतात इ.स.१३९६ ते १४०८ या बारा वर्षांच्या दुष्काळात बैलांच्या पाठीवर धान्य वाहून नेण्याचालदेणीव्यवसाय समाजाने मोठ्या प्रमाणात केला. याच काळात बंजारा समाजाची खरी ओळख निर्माण झाली बंजारानी चीन,तिबेट,ब्रह्मदेश,इराण, काबूल या भागातून धान्य आणून देशाची सेवा केली ते बंदरावर उतरवलेला माल संपूर्ण भारतात पोचवीत असतइ.स.१६३० मध्ये दक्षिण भारतातील विविध बाजारपेठातून बंजारा समाजाने अन्नधान्य खरेदी केल्याचा उल्लेख मिळतो. हे धान्य दक्षिणेहून उत्तरेकडे पोचवले जात. याव्यतिरिक्त इतर जीवनोपयोगी वस्तू तसेच कलाकुसरीच्या वस्तूंची देखील खरेदीविक्री केली जात असे. राजस्थानातील नापीक जमिनीतून परकीय आक्रमकां- पासून सुरक्षित राहण्यासाठी तसेच व्यापारवृद्धि करण्यासाठी बंजारा समाजाने सातत्याने स्थलांतर केले त्यासोबत लदेणीचस्वरूप देखील बदलत गेले. परंतु खरा बदल हा इंग्रजांच्या काळात झालेला दिसून येतो मोगल काळापर्यंत बंजारांचालदेणीव्यवसाय होता. परंतु लॉर्ड डलहौसीच्या काळात भारतात रेल्वेचा प्रारंभ झाल्यानंतर मात्र बंजारांच्या लदेणीव्यवसायास खीळ बसली. त्यामुळे बंजारांना जीवन जगण्यासाठी मिळेल ते साधन जवळ करावे लागले. इंग्रज राजवटीमुळे आपला पारंपारिक व्यवसाय बुडाला ही खंतबंजारांमध्ये कायमची निर्माण

झाली. अशा परिस्थितीत बंजारा समाजाने शेती करणे, पशुपालन करणे,गोणपाट तयार करणे, दारू गाळणे, मोलमजुरी करणे, डिंक गोळा करणे इत्यादी दुय्यमव्यवसाय सुरू केले.

भारतातील अतिप्राचीन मार्गांना लमाण मार्ग म्हणूनच ओळखले जाते. त्यात शंभर मैल लांबीचे रस्ते पाटलीपुत्र ते तक्षशिला पर्यंत आणि काशी ते उज्जेन पर्यंत क्षत्रियांच्या संरक्षणाखाली सुरक्षित ठेवले होते. शिवाय लमाणांच्या बैलाच्या पाठीवर गोण्या वाहून मालाची नेआण करण्याकरिता त्यांना क्षत्रियाचे - संरक्षण मिळत असे. बंजारा समाज काटक श्रमप्रिय, कष्ट करणारा दिसून येतो तरीपण या समाजाची अर्थव्यवस्था इतर समाजापेक्षा मागासलेली आहे. इतर समाजापासून अलिप्त जीवन जगणारा हा समाज आहे. गाई, गुरेढोरे, बैलांचे पालनपोषण करून त्याआधारे वेगवेगळया वस्तूंचा व्यापार करण्याची कला त्यांना आत्मसात होती.लदेणीकालीन अवस्थेत बंजारा समाज पूर्णपणे भटक्या टोळीचे जीवन जगत होते. हे भटकणे निश्चित मार्गाने व उद्देशाने व्हायचे. लदेणीकाळात म्हणजे फिरत्या जीवन काळातील नायकांच्या परवानगीने तांडा जिथुन निघतो त्या मूळ स्थानालाठकणो म्हणत. ठिकाण सोडून निघालेला तांडा म्हणजे लदेणीकरण्यासाठी निघालेला तांडा होय. माल भरण्याच्या प्रक्रियेला गोर भाषेत खेप भरणे किंवा खेप वहाणो म्हणतात.लदेणीकाळात खेप म्हणजे गाईबैलांच्या पाठीवर टाकलेला मान्ल एकदा नेऊन पोचवणे. हे बंजारा गणाच्या 'आरदास' या आदी प्रार्थनेतील 'खेप वटाव रुपारेल चलणो' या वाक्यावरून लक्षात येते. तारीखे खान जहा लोदी या ग्रंथात नियामातुल्लाने असा उल्लेख केला आहे की, सैन्याची पाहणी करताना त्यांच्या असे लक्षात आले की सैनिकांना खाण्यासठी अन्नधान्य नाही. बंजारा हे न आल्यामुळे अन्नधान्याचा तुटवडा झाला होता. त्यामुळे छावणीतून आजम हुमायूं नावाच्या सरंजामदारास पत्र लिहून कळविण्यात येते की छावणीमध्ये अन्नधान्य आणण्यासाठी बंजाराना निरोप देण्यात यावे.लदेणीकाळात बंजारा लोक पालातून राहत असत. परंतु सर्वांना पालात राहण्याचा अधिकार नव्हता. सामाजिक प्रतिष्ठेवर हा अधिकार अवलंबून होता. पुजारी, भगत बनिया, नायक इत्यादी सामाजिक प्रतिष्ठा मिळालेल्या लोकांना पालीतून राहण्याचा अधिकार होता. इतर लोक भरलेल्या गोण्याची भिंत तयार करून त्यांच्या आडोशाला राहत. गोर बोलीच्या गीतांमधून आजहीपालांचे महत्व प्रकट होताना दिसते. युद्धाच्या प्रसंगी दोन्ही बाजूतील सैनिकांना अन्नधान्याची रसद पोहोचवण्याचे काम बंजारा करीत असत. ते जेव्हा सैनिकांसाठी अन्नधान्य घेऊन येत असत तेव्हा पगडीत लिंबाची डहाळी ठेवीत. त्यामुळे त्यांची सैनिकांनाओळख पटत

असे. ज्या मार्गावरून बंजारा मालाची ने आण करीत तो-लमाण मार्ग म्हणून ओळखला जाई. भारतीय उपखंडातून आपले तांडे घेवून फिरत असताना त्यांचा मार्ग निश्चित होता. त्यासाठी प्रत्येक तांड्यात एक नंदी असे. त्याला लदेणीचा मार्ग माहीत असे.तो तांड्याचा बैलांच्या पाठीवर माल टाकून समोर चालत असे. अशा नंदीला मोवळ्या म्हणत. या मोवळ्यामागे तांड्यातील गाईगुरे असत. बंजारा समाजाने शोधलेला लमाण मार्ग कमी अंतराचा व सुरक्षित असे. ते ज्या दिशेने निघतात त्या दिशेने यात्रा मार्ग तयार होत असत. त्यांचा व्यापारात सर्वात मोठा मार्ग मिर्झापूर ते नागपूर होता. अठराव्या शतकाच्या शेवटच्या दशकात टी.मोतीर आणि जे. टी.ब्लट नावाच्या दोन युरोपीय प्रवाशांनी या मार्गावरून यात्रा केली होती.

प्राचीन काळापासून बंजारा समाज व्यापारीच्या रूपात खाद्यपदार्थ आणि इतर साधन सामग्री एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकणी पोहोचवण्याचे काम सामूहिकरीत्या करीत होते. देशाच्या चारही दिशांना दूरदूरपर्यंत यात्रा करावी लागत असल्याकारणाने बरेचदा आपल्या मूळ ठिकाणी पोहोचणे जमत नसे. बंजारा स्त्री पुरुष आपल्या व्यवसायासाठी बैल, बैलगाडी,उंट आणि घोड्यांचा उपयोग करायचे. सुरुवातीला बंजारा समाजाचा मुख्य व्यवसाय मीठाचा होता. लवण या संस्कृत शब्दावरून मीठ हा शब्दप्रयोग व मीठ वाहतूक करणारे लमाणी या अर्थाचा संदर्भ कै. बळीराम पाटील यांनीही दिला आहे. इंग्रजांनी बंजारा समाजाला आर्थिक दृष्ट्या कमकुवत करण्यासाठी ३१ डिसेंबर १८५९ मध्ये मिठकर विधेयक पास केला. बंजारा समाजाने याचा विरोध केला.1930 मध्ये महात्मा गांधी सोबत विरोध करण्यासाठी दांडीमार्च मध्ये सहभाग सुद्धा घेतला. इंग्रजांच्या निर्णयांमुळे मिठाचा व्यवसाय करणाऱ्या बंजारा समाजाचा कणाच मोडला गेला. शेवटी त्यांना आपला पैतृक व्यवसाय बदलावा लागला. त्यानंतर बंजारा समाज आज पर्यंत छोटे - मोठे काम करून आपला उदरनिर्वाह करत आहे.

**निष्कर्ष :**

बंजारा समाजाने दळण-वळणाची साधने उपलब्ध नसताना देशभर अन्नधान्य पुरविण्याचे अतिशय महत्वाचे काम केल्याचे दिसते. एका अर्थाने बंजारा समाज देशाच्या दळण-वळण वाहतुकीचे अत्यंत महत्वाचे काम काम करणारा ऐतिहासिक समाज असल्याचे दिसते. देशाच्या आजच्या महामार्गांची, रेल्वेमार्गांची अत्यंत उपयुक्त माहिति आजहि बंजारा समाजाला आहे सतत कराव्या लागणाऱ्या

भटकंतीमुळे या समाजाने अनेक नवीन मार्ग शोधून काढले आहेत व्यवसायाबरोबर मोगल, ब्रिटीश,आणि मराठा सैन्याला लष्करी साहित्य,अन्नधान्य यांची रसद पुरवण्याचे काम इतिहासकाळात या जमातीने केल्याचे दिसते.

पूर्वी जीवन जगण्यासाठी लढा आणि हा व्यवसाय करून पोट भरणारा समाज त्याकाळी देश परदेशगमन करत असे. परंतु आज मात्र हा समाज शेती हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात करताना आढळतो. तसेच दारिद्र्य, उत्पन्नाच्या साधनांच्या कमतरतेमुळे व आधुनिकीकरणामुळे कामाच्या शोधात शहराकडे स्थलांतरित होताना दिसत आहे.काबाडकष्ट व अंगमेहनतीची कामे करणारा बंजारा समाज आजही भारताच्या विविध क्षेत्रात अतिशय मोलाचे योगदान देत आहे.

**संदर्भसूची:**

१) राठोड सुनील आनंदराव – बंजारा जमात,लोकजीवन आणि लोकगीते, मधुराज पब्लिकेशन, प्रा. लि. शनिवार पेठ, पुणे, २०१२

२) राठोड आत्माराम कनिराम – गोर बंजारा इतिहास व लोकजीवन,गोरवट प्रकाशन, यवतमाळ, १९९४

३) शर्मा श्रीराम – बंजारा समाज, दक्षिण प्रकाशन, हैद्राबाद, १९८१

४) डॉ. केशव फालके – बनजारा लोक साहित्य, संकल्प प्रकाशन, मुलुंड(प.), १९९३

५) मोतीचंद्र – सार्थवाह, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, २०१०

६) डॉ. गणपत राठोड – बंजारा लोकगीतोका संस्कुतिक अध्ययन, चंद्रलोक प्रकाशन, कानपूर, २००२

७) Kanitkar S. R. - History of India, Continental Publication, Pune, 1934